**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुद्दु सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587



दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे






वर्ष ५ । अंक २५१ । शनिवार ४ जुलै २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322


# पारनेरमध्ये एलसीबीकडून मावा व सुगंधित तंबाखू जप्त

## दोनजणांवर गुन्हे दाखल । अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने पारनेर शहरात वैदुवस्ती भागात प्रतिबंधित सुगंधित तंबाखू आणि मावा तयार करून विक्री करणाऱ्या दोन आरोपींना रंगेहाथ पकडले. या कारवाईत पोलिसांनी २ लाख ५८ हजार १०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड आणि त्यांच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, पारनेर शहरातील वैदुवस्ती येथे राजू शिंदे व मच्छिंद्र शिंदे हे दोघे आपापल्या घरात मशीनच्या साहाय्याने मावा तयार करून विकत आहेत.



माहिती मिळताच पथकाने ४ जुलै रोजी सकाळी वैदुवस्ती येथील दोन्ही संशयित ठिकाणी छापे टाकले. या छाप्यात पोलिसांनी राजू दत्तू शिंदे (वय ५५, रा. वैदुवस्ती, पारनेर), मच्छिंद्र बबन शिंदे (वय ४०, रा. वैदुवस्ती, पारनेर) यांना अटक केली.

दोन्ही ठिकाणांवरून ■ पान ४ वर

### पथकात यांचा समावेश

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे तसेच तपास पथकातील उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड, पोलीस अंमलदार राहुल द्वारके, प्रकाश मांडगे, अमोल आजबे, सागर ससाणे, महिला पोलीस अंमलदार वंदना मोढवे आणि चालक महादेव भांड यांच्या पथकाने केली.

# अहिल्यानगर शहरातील मोकाट कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करा

## शिवसेनेचे मनपा आयुक्तांना निवेदन । मनपा आयुक्त उपस्थित नसल्याने त्यांच्या खुर्चीला निवेदन चिटकविण्यात आले

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** २ जुलै रोजी शहरातील वाडीया पार्क, टिळक रोड परिसरात मोकाट पिसाळलेल्या कुत्र्याने हौदस घालून तब्बल चाळीस जनांना चावा घेतला. यामधील सर्व जिल्हा रुग्णालयात आणि खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. महानगरपालिकेचे आरोग्य विभाग झोपेचे सोंग घेत असून नागरीकांनी कळवुन सुद्धा महानगरपालिका प्रशासन जागे झालेले नाही. मोकाट कुत्रे पकडण्याचे कंत्राट ज्यांना दिले आहे ती एजन्सी नेमके कोणते कुत्रे पकडते असा सवाल नागरीक करत आहेत. याबाबत शिवसेना आक्रमक झाली असून जोपर्यंत या भागातील व शहरातील मोकाट कुत्रे पकडले गेले नाही तर शिवसेना पद्धतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जातील असा इशारा शिवसेना शहर प्रमुख संभाजी कदम यांनी प्रशासनाला दिला आहे शिवसेनेच्या वतीने मोकाट कुत्र्यांच्या बाबत निवेदन घेऊन शिष्यमंडळ गेले असता मनपा आयुक्त त्यांच्या दालनामध्ये उपस्थित नव्हते यावेळी कुठल्याही प्रकारचा अधिकारी निवेदन स्वीकारण्यासाठी आला नाही यावेळी संतापलेल्या शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी मनपा आयुक्त यांच्या खुर्चीला हे निवेदन चिटकवून याचा जाहीर निषेध केला यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे शहर प्रमुख संभाजी कदम ज्येष्ठ नगरसेवक बाळासाहेब बोराटे विक्रम राठोड,दत्ता कावरे संग्राम कोतकर राम वडागळे आप्पासाहेब शिंदे अभिजीत अष्टेकर आदी उपस्थित होते.

# नेवासा फाट्यावर एका तरुणावर कोयत्याने हल्ला

## अवघ्या २५ मिनिटांत 'सिंघम' पोलीस निरीक्षक प्रताप दराडेंनी आवळल्या मुसक्या!



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासा–** नेवासा फाटा परिसरात दहशत माजवण्याच्या उद्देशाने एका तरुणावर कोयत्याने प्राणघातक हल्ला करणाऱ्या सराईत गुन्हेगारांना नेवासा पोलिसांनी अवघ्या २५ मिनिटांत बेड्या ठोकल्या आहेत. नेवासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी दाखवलेल्या 'दबंग' आणि कौतुकास्पद तत्परतेमुळे आरोपींना पळून जाण्याची संधीच मिळाली नाही. या धडाकेबाज कारवाईमुळे गुन्हेगारांचे धाबे दणाणले असून परिसरातून पोलिसांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

**नेमकी घटना काय?**

नेवासा फाटा परिसरात काल एका तरुणावर वैयक्तिक वैमनस्यातून ■ पान ४ वर

# रेकॉर्डवरील २२० गुन्हेगारांची पोलीस मुख्यालयात हजेरी!

## एसपी मुम्मका सुदर्शन यांच्या संकल्पनेतून उपक्रम । समुपदेशन करून गुन्हेगारीच्या मार्गावर न जाण्याची दिली तंबी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अधिक मजबुत करण्यासाठी आणि गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशाने जिल्ह्यातील दक्षिण विभागातील पोलीस ठाणे हद्दीतील गंभीर गुन्हे दाखल असलेल्या २२० रेकॉर्डवरील गुन्हेगारांची आज, शनिवारी पोलीस मुख्यालयात सामूहिक हजेरी घेण्यात आली. या उपक्रमात गुन्हेगारांचे विशेष समुपदेशन करुन त्यांचे इंट्रॉगेशन फॉर्म भरुन घेऊन, प्रतिबंधक कारवाईच्या बंधपत्राची माहिती घेण्यात आली. तसेच पुन्हा गुन्हेगारीच्या मार्गावर गेल्यास कठोर कायदेशीर कारवाईची तंबीही या गुन्हेगारांना देण्यात आली.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे तसेच दक्षिण विभागातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यावेळी उपस्थित होते. गेल्या काही दिवसांपासून अहिल्यानगर जिल्हा पोलिसांनी गुन्हेगाराविरोधात विशेष मोहीम हाती घेतली असून, अवैध धंदे, शस्त्र बाळगणारे, फरार आरोपी आणि सराईत गुन्हेगारांविरोधात सातत्याने कारवाई सुरु आहे. त्याच मोहिमेचा एक भाग म्हणुन हे विशेष समुपदेशन आयोजित करण्यात आले. या उपक्रमामुळे रेकॉर्डवरील गुन्हेगारांमध्ये चांगलाच धाक निर्माण झाला असून, जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ■ पान ४ वर



### कायद्याच्या चौकटीत राहा, गुन्हेगारी सोडून प्रवाहात या...

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी यावेळी गुन्हेगारांशी संवाद साधताना कायद्याच्या चौकटीत राहुन वर्तन करण्याचा सल्ला दिला. गुन्हेगारी सोडून समाजाच्या मुख्य प्रवाहत सहभागी होण्याचे आवाहन करतांना, भाईगिरी, गँगवार, खंडणी, मारामारी, दहशत निर्माण करणे, शस्त्राचा बेकायदेशीर वापर तसेच कोणत्याही प्रकारचा कयदा व सुव्यवस्था बिघडविण्याचा प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही. अशा प्रकारच्या घटना घडल्यास संबंधिताविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई, तडीपारची प्रक्रिया तसेच इतर कठोर कायदेशीर उपाय योजना करण्यात येतील तसेच जिल्ह्यात शांतता, सुव्यवस्था आणि नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना कायम रहावी, या उद्देशाने आरोपींना कायद्याचे पालन करण्याच्या स्पष्ट सूचना एसपींनी दिल्या.

# महावितरणच्या गलथान कारभाराविरोधात खा. नीलेश लंके यांचे जनआंदोलन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** महावितरणच्या कथित निष्काळजी व जनविरोधी कारभारामुळे नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि ग्राहकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांच्या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी येत्या ८ जुलै रोजी अहिल्यानगर येथील महावितरण कार्यालयासमोर तीव्र जनआंदोलन करण्याची घोषणा केली आहे.

यासंदर्भात महावितरणचे अधीक्षक अभियंता यांना निवेदन देऊन लंके यांनी आंदोलनापूर्वीच सर्व प्रलंबित प्रश्नांवर ठोस निर्णय घेण्याची मागणी केली आहे. अन्यथा उद्भवणाऱ्या परिस्थितीस प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

मतदारसंघातील अनेक भागांत सुरू असलेले अघोषित व अनियमित लोडशेडिंग, जळालेले ट्रान्सफॉर्मर (डीपी) वेळेत न बदलणे, स्मार्ट मीटरमुळे वाढीव व चुकीची वीजबिले, अतिवृष्टी व वादळामुळे नुकसान झालेल्या वीज यंत्रणेची रखडलेली दुरुस्ती, सौरऊर्जा व नेट मीटरिंग प्रकरणांतील विलंब, तक्रार निवारण यंत्रणेचे अपयश, कृषी वीजजोडणीतील विलंब आणि देखभालीच्या अभावामुळे निर्माण होणारे वारंवार तांत्रिक बिघाड या प्रमुख प्रश्नांकडे त्यांनी निवेदनातून लक्ष वेधले आहे.

सौरऊर्जा योजनेसाठी पैसे भरूनही अनेक शेतकऱ्यांना एक ते दोन वर्षे सोलर पॅनेल बसवून मिळत नसल्याचा तसेच काही एजन्सीकडून अतिरिक्त रकमेची मागणी होत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

■ पान ४ वर



## दै. आकर्षण निवडक

### अनुसूचित जातीच्या विकास निधीचा गैरवापर, दोषींवर ॲट्रॉसिटी कायद्यान्वये कारवाईची मागणी

अहिल्यानगर - अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या शासकीय निधीचा गैरवापर करून दलित समाजाच्या विकासाला खीळ घालण्यात आल्याचा गंभीर आरोप करत संबंधित दोषींवर अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा तसेच नागरी हक्क संरक्षण कायद्यान्वये कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी डॉ. संजय बन्सीभाऊ उदमले यांनी केली. यासंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे अध्यक्ष किशोरजी मकवाना यांच्याकडे सादर केलेल्या तक्रारीची माहिती दिली. डॉ. उदमले यांनी सांगितले की, पाथर्डी नगर परिषदेत अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजासाठी राखीव असलेल्या विकास निधीचा इतर कामांसाठी वापर करण्यात आला. त्यामुळे दलित समाज विकासकामांपासून वंचित राहिला असून शासनाच्या उद्देशालाच हरताळ फासला गेला आहे. याबाबत समाजकल्याण विभागाने केलेल्या चौकशी अहवालातही संबंधित योजनेतील निधीचा इतरत्र वापर झाल्याचे स्पष्ट झाल्याचा दावा त्यांनी केला. संबंधित अधिकारी व तत्कालीन मुख्याधिकारी यांनी अधिकारांचा गैरवापर करून शासनाच्या निधीचा चुकीचा वापर केल्याने त्यांच्यावर नागरी हक्क संरक्षण कायदा, १९५५ तसेच अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ अंतर्गत गुन्हे दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.उपस्थितांनी अनुसूचित जाती समाजाच्या विकासासाठी राखीव निधीचा गैरवापर करणाऱ्यांवर कठोर कारवाई करून दलित समाजाला न्याय मिळावा, अशी मागणी केली आहे.

### धोत्रे बु. ग्रामपंचायतीतील विकासकामांवर गंभीर अनियमिततेचे आरोप

अहिल्यानगर - पारनेर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या मौजे धोत्रे बु. ग्रामपंचायतीमध्ये १४ वा व १५ वा वित्त आयोग तसेच विविध शासकीय योजनांमधील विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीने केला आहे. या प्रकरणाची पारनेर पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांकडून नव्हे, तर स्वतंत्र त्रयस्थ समितीमार्फत सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी समितीने केली आहे. तसेच १५ दिवसांच्या आत कारवाई न झाल्यास २१ जुलै रोजी नाशिक येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे. याबाबत विभागीय आयुक्त, नाशिक तसेच ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव यांना निवेदन पाठविण्यात आले आहे. यापूर्वी २७ मे रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्याकडेही तक्रार करण्यात आली होती. मात्र, चौकशीची जबाबदारी पुन्हा त्याच पंचायत समितीतील अधिकाऱ्यांवर सोपविण्यात येत असल्याने निष्पक्ष चौकशी होण्याबाबत शंका व्यक्त करण्यात आली आहे.समितीच्या म्हणण्यानुसार, ग्रामपंचायतीत झालेल्या विकासकामांमध्ये शासनाच्या नियमांचे उल्लंघन करण्यात आले असून अनेक कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची करण्यात आली आहेत. कामांचे आराखडे, अंदाजपत्रके, स्पॉट पंचनामे, दप्तर तपासणी तसेच प्रत्यक्ष पाहणी करून सर्व कामांची स्वतंत्र चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनात ई-टेंडर प्रक्रियेतही गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. जीपीएस लॉगिंग, जिओ-टॅगिंग यांसारख्या बंधनकारक बाबींचे पालन झाले नसल्याचे नमूद करण्यात आले असून, राज्य व केंद्र शासनाच्या निधीतून करण्यात आलेल्या खर्चाचा जीएसटी भरणा, संबंधित बँक खात्यांची तपासणी तसेच आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. सन २०१९ पासून आजअखेर झालेल्या ग्रामसभा व मासिक सभांच्या इतिवृत्तांची तपासणी करून उपस्थित ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्यांची प्रयोगशाळेमार्फत पडताळणी करावी, तसेच ग्रामसभांचे व्हिडिओ चित्रीकरण तपासण्यात यावे, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.ग्रामसभा न घेता केवळ कागदोपत्री ग्रामसभा दाखवून घंटागाडी खरेदी करण्यात आल्याचा आरोप समितीने केला आहे. या खरेदीमध्ये जादा दर दाखविण्यात आल्याचा दावा करण्यात आला असून, प्रत्यक्षात आजपर्यंत या घंटागाडीचा कचरा संकलनासाठी उपयोगच करण्यात आलेला नसल्याचे म्हटले आहे. याशिवाय ॲरो प्लँटसाठी साहित्य खरेदी करूनही ते वापरात न आणता धूळ खात पडून असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# प्रधानमंत्री आवास योजनेतील रखडलेल्या घरकुलांचा प्रश्न मार्गी लावा : आ. दाते

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पारनेर–** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात प्रधानमंत्री आवास योजना आणि इतर घरकुल योजनांतील रखडलेल्या कामांचा प्रश्न विधानसभेत उपस्थित करत हजारो गोरगरीब कुटुंबांना न्याय मिळवून देण्याचा ठाम प्रयत्न केला. राज्यातील लाखो लाभार्थ्यांची अपूर्ण घरकुले, रखडलेले हप्ते, तांत्रिक अडचणी आणि वाढत्या बांधकाम खर्चामुळे सर्वसामान्यांची होत असलेली परवड त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली.

आमदार दाते यांनी राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेतील हजारो घरकुले अद्याप अपूर्ण असल्याचा मुद्दा उपस्थित केला. लाभार्थ्यांना वेळेवर हप्ते मिळत नसल्याने, प्रणालीतील तांत्रिक त्रुटी, तसेच सिमेंट, लोखंड व इतर बांधकाम साहित्याच्या वाढत्या किमतींमुळे अनेक गरीब कुटुंबांना कर्ज काढून घराचे बांधकाम करावे लागत असल्याची वस्तुस्थिती त्यांनी मांडली.

याशिवाय, जुनी घरे पाडल्यानंतरही नवीन घरकुल अपूर्ण राहिल्याने अनेक कुटुंबांना तात्पुरत्या निवाऱ्यात दिवस काढावे लागत असल्याचे सांगत, रखडलेले हप्ते तातडीने वितरित करावेत, तांत्रिक अडचणी दूर करून लाभार्थ्यांना दिलासा द्यावा आणि वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर अनुदानात वाढ करण्याची ठोस मागणी त्यांनी शासनाकडे केली.

यावर उत्तर देताना ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या खात्यात थेट निधी वर्ग करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती दिली. तसेच वाढत्या बांधकाम खर्चाचा विचार करून शासनाने अतिरिक्त अनुदान मंजूर केले असून, घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू मोफत देण्याचा निर्णय घेतल्याचेही त्यांनी सभागृहात स्पष्ट केले. पावसाळ्यापूर्वी अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यासाठी प्रशासनाला आवश्यक निर्देश देण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

# पैठण खुल्या कारागृहातून पळालेला कैदी बार्शीतून जेरबंद

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** पैठण येथील खुल्या कारागृहातून पळून गेलेल्या कैद्याला पैठण पोलिसांच्या विशेष पथकाने सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथून अटक केली. पांडुरंग उर्फ वेडा कल्याण काकडे असे अटक करण्यात आलेल्या कैद्याचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पांडुरंग काकडे हा पैठण येथील खुल्या कारागृहात शिक्षा भोगत होता. २५ जानेवारी २०२६ रोजी त्याने कारागृहातून पलायन केले होते. याप्रकरणी पैठण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष



पथक नियुक्त करण्यात आले होते.

दरम्यान, गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी बार्शी परिसरात असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पैठण पोलिसांच्या पथकाने बार्शी येथे सापळा रचून पांडुरंग काकडे याला शिताफीने ताब्यात घेतले. अटकेनंतर त्याला पुढील कायदेशीर प्रक्रियेसाठी न्यायालयात हजर करण्यात आले.

ही कारवाई छत्रपती संभाजीनगर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी व उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या मोहिमेत पैठणचे पोलीस निरीक्षक महादेव गोमारे, पोलीस उपनिरीक्षक शेख तसेच हेड कॉन्स्टेबल मोकळे व बल्लाळ यांनी सहभाग घेतला.

# कान्हूर पठारला भूमिपुत्र शेतकरी संघटनेची सोमवारी बैठक

**बेरोजगार तरुणांसाठी भूमिपुत्र संघटनेचा पुढाकार । शेतीसमोरील आव्हाने, पुढील दिशा आणि ग्रामीण युवकांसाठी रोजगाराच्या संधींवर मार्गदर्शन**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर संघटितपणे चर्चा करून भविष्यातील दिशा निश्चित करण्याच्या उद्देशाने भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या वतीने सोमवार, दि. ६ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. ही बैठक रेनबो फार्म हाऊस, कान्हूर पठार, ता. पारनेर येथे होणार असल्याची माहिती भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष वाडेकर यांनी दिली.

या बैठकीत शेतीसमोरील आव्हाने व पुढील दिशा या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे. सध्याच्या काळात शेतीपुढे उभ्या राहिलेल्या विविध समस्या, उत्पादन खर्चातील वाढ,





बाजारपेठेतील चढ-उतार, नैसर्गिक संकटे, शेतमालाला मिळणारा भाव तसेच आधुनिक शेतीच्या संधी आणि शाश्वत शेतीविषयी चर्चा होणार आहे.

याशिवाय ग्रामीण भागातील बेरोजगार तरुणांनी कोणते व्यवसाय करावेत, स्वयंरोजगाराच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत आणि शेतीपूरक उद्योगातून आर्थिक प्रगती कशी साधता येईल, याबाबतही विशेष मार्गदर्शन केले जाणार आहे. या बैठकीस सह्याद्री फार्मर प्रोड्युसर कंपनीचे प्रतिनिधी तात्याराम हिरवे हे मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार असून, ते शेती, कृषी व्यवसाय, मूल्यवर्धन, बाजारपेठ, तसेच ग्रामीण उद्योजकतेच्या संधींबाबत सविस्तर माहिती देणार आहेत.

भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी तालुक्यातील शेतकरी, युवक, कृषी क्षेत्राशी संबंधित नागरिक तसेच स्वयंरोजगाराची इच्छा असलेल्या तरुणांनी या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.संघटनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडणे, शेतीला सक्षम दिशा देणे आणि ग्रामीण भागातील युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी अशा बैठका महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वासही आयोजकांनी व्यक्त केला आहे.

### तपोवन रोड-ढवण वस्ती परिसरात

# लवकरच महापालिकेची सिटी बस सेवा सुरु करणार - संपत बारस्कर



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** तपोवन रोड परिसरात एकेकाळी विकासाची कोणतीही कामे झाली नव्हती. मात्र गेल्या दहा वर्षांत नियोजनबद्ध आणि कायमस्वरूपी विकासकामांमुळे या परिसराचा संपूर्ण कायापालट झाला आहे. पाणीपुरवठा, रस्ते, स्ट्रीट लाईट, ड्रेनेज यांसारखे मूलभूत प्रश्न मार्गी लागल्याने आज या भागाची स्वतंत्र ओळख निर्माण झाली असून मोठ्या संख्येने नागरिक येथे वास्तव्यास येत आहेत. तपोवन हडको परिसरातील सर्वसामान्य नागरिक अनेक वर्षे विकासापासून वंचित होते, परंतु त्यांच्या बहुतांश समस्या सोडविण्यात यश आले आहे. सर्वसामान्य नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे हेच आमचे कर्तव्य असून तपोवन रोडच्या कडेला नव्याने विकसित होत असलेल्या बाजारपेठेमुळे आणि वाढत्या लोकवस्तीमुळे या भागाला महापालिकेच्या सिटी बस सेवेची नितांत आवश्यकता आहे. त्यामुळे तपोवन रोड-ढवण वस्ती परिसरात लवकरच महापालिकेची बस सेवा सुरू करण्यात येईल, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी केले.

प्रभाग क्रमांक १ मधील तपोवन हडको येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्या प्रयत्नातून सभामंडप व परिसर सुशोभीकरणाच्या विकासकामाचे भूमिपूजन उत्साहात संपन्न झाले.

यावेळी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, श्याम माने, चंदू ताके, बाळासाहेब खाकाळ, तुकाराम बोरुडे, अनिकेत खुर्जीकर, श्रीनिवास कोडम, महादेव नजन, दीपक मेढे, संध्या मेढे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे म्हणाले की, तपोवन हडको वसाहतीमध्ये सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने वास्तव्यास असून या भागात पूर्वी विकासाच्या कोणत्याही सुविधा उपलब्ध नव्हत्या. आमदार संग्राम जगताप आणि नगरसेवक संपत बारस्कर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या भागातील बहुतांश मूलभूत प्रश्न मार्गी लागले आहेत. महापालिकेच्या कचरा डेपोचा गंभीर प्रश्नही

# डॉक्टर्स डे व मा. श्री. सीताराम खिलारी यांच्या जन्मदिनानिमित्त श्री ढोकेश्वर महाविद्यालयात वृक्षारोपण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** डॉक्टर्स डे तसेच मा. श्री. सीताराम खिलारी विश्वस्त, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहिल्यानगर. यांच्या जन्मदिनानिमित्त श्री ढोकेश्वर महाविद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

महाविद्यालय परिसरात विविध प्रकारच्या सावली व फळझाडांच्या रोपांचे वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. ''एक विद्यार्थी एक वृक्ष'' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवत विद्यार्थ्यांनी वृक्षारोपणात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.



लक्ष्मणराव मतकर यांनी वृक्षांचे पर्यावरणीय, सामाजिक आणि आरोग्यविषयक महत्त्व अधोरेखित केले. वाढते प्रदूषण, हवामानातील बदल आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच डॉक्टर्स डे निमित्त समाजाच्या आरोग्यरक्षणासाठी कार्य करणाऱ्या सर्व वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी मा. श्री. सीताराम खिलारी यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि लोकहिताच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला. वृक्षारोपण प्रसंगी संस्थेच्या गवर्निंग कौन्सिल सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी, डॉ. प्रदीप दाते, डॉ. शोभा गायके यांनी वैदकीय दृष्ट्या वृक्षारोपनाचे महत्व अधोरेखित केले. कार्यक्रमात प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, विद्यार्थी व चे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी वृक्षसंवर्धनाची शपथ घेत लावलेल्या रोपांचे संगोपन करण्याचा निर्धार व्यक्त केला. पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणारा हा उपक्रम महाविद्यालय परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# श्रीगोंद्याचे एस एस के पोस्ट ऑफिस बंद करू नका

**नागरिकांच्या सुविधांसाठी खासदार नीलेश लंके यांची ठाम भूमिका । ज्येष्ठ, शेतकरी, विद्यार्थी आणि लघु व्यावसायिकांच्या हितासाठी पोस्टमास्टर जनरल यांना पत्र**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**श्रीगोंदा–** श्रीगोंदा शहरातील एस एस के पोस्ट ऑफिस (पिनकोड ४१३७२६) बंद करण्याच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी या निर्णयाला विरोध दर्शवत पोस्टमास्टर जनरल, पुणे यांच्याकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. जनहिताचा विचार करून हे पोस्ट ऑफिस पूर्ववत सुरू ठेवण्याबरोबरच येथील मनुष्यबळ आणि तांत्रिक सुविधा वाढवून सेवा अधिक सक्षम कराव्यात, अशी मागणी त्यांनी पत्राद्वारे केली आहे.

खासदार लंके यांनी पाठविलेल्या पत्रात श्रीगोंदा शहरातील एस एस के पोस्ट ऑफिस हे स्थानिक नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचे सेवा केंद्र असल्याचे नमूद केले आहे. या कार्यालयातून टपाल सेवा, अल्पबचत योजना, आर्थिक व्यवहार, आधारसंबंधित कामे तसेच विविध शासकीय कागदपत्रांची देवाणघेवाण नियमितपणे होत असल्याने ग्रामीण आणि निमशहरी भागातील नागरिकांसाठी त्याचे मोठे महत्त्व असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

डिजिटल व्यवहारांचा विस्तार होत असला तरी ज्येष्ठ नागरिक, महिला, शेतकरी आणि ग्रामीण भागातील अनेक नागरिक आजही प्रत्यक्ष टपाल सेवेवर अवलंबून असल्याचे लंके यांनी पत्रात स्पष्ट केले आहे. त्यामुळे हे कार्यालय बंद झाल्यास सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागेल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे.

पत्रात पुढे नमूद करण्यात आले आहे की, पोस्ट ऑफिस बंद झाल्यास ज्येष्ठ नागरिकांना लांबच्या अंतरावर जाऊन व्यवहार करावे लागतील. तसेच लहान व्यावसायिकांच्या दैनंदिन आर्थिक व्यवहारांवर त्याचा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे केवळ कार्यालय सुरू ठेवणेच नव्हे, तर ते अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून आधुनिक तांत्रिक सुविधा वाढविणे गरजेचे असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर पोस्टमास्टर जनरल यांनी तातडीने आवश्यक निर्देश देऊन श्रीगोंदा येथील एस एस के पोस्ट ऑफिस बंद करण्याचा कोणताही निर्णय न घेता ते पूर्वीप्रमाणे सुरळीत सुरू ठेवावे, अशी आग्रही मागणी खासदार नीलेश लंके यांनी केली आहे.

### पानपट्टी व्यावसायिकांचा शासनाविरोधात एल्गार

# ७ जुलैला मुंबईच्या आझाद मैदानावर धडक मोर्चा




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन विभागाकडून पान व्यावसायिकांवर सुरू असलेल्या कारवाईच्या निषेधार्थ महाराष्ट्र पान व्यापारी महासंघाच्या वतीने, अहिल्यानगर जिल्हा पान असोसिएशनच्या सहकार्याने सीताबन लॉन, मार्केट यार्ड येथे भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात राज्यभरातील पानपट्टी व्यावसायिकांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली असून, येत्या ७ जुलै २०२६ रोजी मुंबईतील आझाद मैदानावर भव्य धडक मोर्चा काढण्याची घोषणा करण्यात आली.

मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र पान व्यापारी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अजित सूर्यवंशी होते. यावेळी अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष फैय्याज तांबोळी, तुषार मेहेत्रे, गणेश जाधव, आबा काळे, समीर शेख, साहेब तांबोळी, बाळू हमपे, राजेंद्र बनसोडे, गणेश शिंदे, महेश मुर्तडकर यांच्यासह यांच्यासह पदाधिकारी, होलसेल व्यापारी, पानपट्टीधारक, फेरीवाले व मोठ्या संख्येने व्यावसायिक उपस्थित होते.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### वीर हनुमान पायी दिंडी सोहळ्याचे मंगळवार १४ जुलै रोजी अहिल्या नगरहून प्रस्थान होणार

अहिल्यानगर - सालाबाद प्रमाणे वीर हनुमान वारकरी सेवाभावी प्रतिष्ठाण च्या वतीने अहिल्यानगर ते पंढरपूर आषाढी वारी पायी दिंडी सोहळ्याचं मंगळवार दि १४ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वा हनुमान मंदिर ,मार्केट यार्ड ,अहिल्यानगर येथून प्रस्थान होणार आहे अशी माहिती अध्यक्ष दत्ता बाबासाहेब जाधव यांनी दिली . यावेळी दिंडी सोहळा विषयी बोलताना अध्यक्ष दत्ता जाधव म्हणाले कि मागील २३ वर्षांपासून आम्ही या दिंडी सोहळ्याचे आयोजन करत आलो आहोत .आमची दिंडी अतिशय शिस्तबद्ध व वेळेचे पालन करणारी आहे .या दिंडी मध्ये जर भाविकांना सहभागी व्हायचे असेल तर त्यांनी या मोबाईल नंबर वर ९४०५००१४७४,९४०४६१५१५१,९५८८२६३१३१,९९२३६८११२२,७७७६८८७७११ संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे दिंडी यशस्वीते साठी मार्गदर्शक बाबासाहेब भाऊसाहेब जाधव यांचे मोठे सहकार्य मिळत असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली,उपाध्यक्ष नंदू गाडळकर ,सचिव झुंबर आव्हाड ,खजिनदार मनोज आजबे ,ह,भ.प .संजय महापुरे ,रामदास कानडे ,गोविंद सांगळे ,राजेंद्र कानडे ,विक्रांत राऊत ,मिमराज रासकर ,यशवंत ओटी ,छबु गाडळकर ,शंकर रासकर आदी प्रयन्तशील आहे .तसेच या दिंडी काळात श्री विशाल गणेश मंदिर चे महंत संगमनाथजी महाराज या दिंडीत सहभागी होणार आहेत. तसेच या संपूर्ण दिंडी कालावधीत रोज रात्री मुक्कामाच्या ठिकाणी किर्तन सेवेचे आयोजन करण्यात आले आहेत यामध्ये ह.भ.प.संजय महाराज महापुरे ,ह.भ.प.अमित महाराज धाडगे ,ह.भ.प.प्रसाद महाराज देव, ह.भ.प. मनोहर महाराज सिनारे ,श्रीराम भक्त सत्संग सेवा मंडळ यांचा हनुमान चालिसा पाठ , ह.भ.प. राजेंद्र महाराज शहाणे , ह.भ.प. किशोर महाराज जाधव , ह.भ.प. मछिंद्र महाराज भोसले , ह.भ.प. बाबासाहेब गोलांडे यांचा भारुडाचा कार्यक्रम ,वैराग्य मूर्ती ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज डांगरे ,स्वामी अमृतानंद सरस्वती ,कृष्ण कृपाकींत डॉ विकासनानंद महाराज मिसाळ आदींची कीर्तन सेवा मिळणार आहे.

### महापौर ज्योतीताई गाडे यांची शमी गणपती मंदिरास सदिच्छा भेट




अहिल्यानगर -स्वयंभू शमी गणपती मंदिर हे अहिल्यानगर शहरातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे.संकष्टी चतुर्थी असल्याने गणपतीचे दर्शन घेण्याची इच्छा झाली होती. शमी गणपतीचे दर्शन घेतल्याने मन प्रसन्न झाले.शमी वृक्षाच्या मुळापासून शमी गणपती तयार झाला आहे.येथे शहरातील भाविक मोठ्या श्रद्धेने दर्शनासाठी येत असतात. अशा पुरातन मंदिराची माहिती व ओळख होणे नवीन पिढी साठी महत्त्वाचे आहे.असे प्रतिपादन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले आहे.दिल्लीगेट येथील शमी गणपती मंदिर ट्रस्ट येथे संकष्टी चतुर्थी निमित्त महापौर ज्योतीताई गाडे यांनी सदिच्छा भेट दिल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शमी गणपती मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष विनायक देशमुख,पुजारी प्रमोद रेखी गुरुजी,जिल्हा ब्युटी असोसिएशनचे अध्यक्ष अनुजा कांबळे,ऋतुजा धोत्रे, महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समितीचे माजी सदस्य महेश कांबळे आदी उपस्थित होते. विनायक देशमुख म्हणाले, दिल्लीगेट वेशीतील शमी गणपती येथे मोठ्या भक्ती भावाने व श्रद्धेने भाविक दर्शनासाठी येत असतात. स्वयंभू शमी गणपती हा १०० वर्षाहून अधिक काळापासून स्थापित झालेला असल्याने तो भक्तांच्या नवसाला पावणारा गणपती आहे.शमी वृक्षाच्या पानाची पूजा दसऱ्याच्या दिवशी सीमोल्लंघन प्रसंगी केली जाते. व त्यानंतर सोने लुटण्यात येते. अशी प्रथा आहे.त्यामुळे शमी गणपतीला एक विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे.

### दिल्लीगेट येथील प्रदर्शन व विक्री मेळाव्याला नगरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

अहिल्यानगर -दिल्लीगेट येथील शमी गणपती मंगल कार्यालयात अमृत व प्रतिबिंब संस्था अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने शमी गणपती हॉल,दिल्लीगेट येथे तीन, चार, पाच जुलै रोजी तीन दिवशीय बचत गटांचे उद्योजक प्रदर्शन व विक्री मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या प्रदर्शनास अहिल्यानगर शहरातील ग्राहकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला आहे.या प्रदर्शनामध्ये हस्तकला, कपडे, ज्वेलरी,आयुर्वेदिक सौंदर्यप्रसाधने, किड्स वेअर, फूड स्टॉल, उन्हाळी वाळवण, गृहपयोगी वस्तू,गिफ्ट आर्टिकल,गावरान मटकी, काराळे व धान्य असे विविध प्रकारचे स्टॉल्स असल्याने नगरच्या ग्राहकांना आकर्षित केले जात आहे.

## जिल्हा ग्रंथालय अधिकारी अशोक गाडेकर यांची नवी मुंबई येथे बदली

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** अशोक गाडेकर जिल्हा ग्रंथालय अधिकारी,अहिल्यानगर यांची लोकहीत व प्रशासकीय कारणास्तव, सहायक ग्रंथालय संचालक, कोकण भवन नवी मुंबई येथे बदली झाली आहे.

तेसन २०१९ मध्ये जिल्हा ग्रंथालय अधिकारी या पदावर अहिल्यानगर येथे रुजू झाले होते. त्यांच्या बद्दल सर्वांना खूप आदर होता. एका सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचारी म्हणून असलेला अनुभव त्यांच्या पाठीशी होता त्यामुळे ग्रंथालयांच्या व कर्मचाऱ्यांच्या व्यथा त्यांना माहिती होत्या.. तितकेच तें शिस्तीचे ही भोक्ते होते. त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यात त्यांनी ग्रंथालय व वाचन संस्कृतीमध्ये खूपच चांगली प्रगती केली. कोरोना काळात लॉक डाउन मध्ये त्यांनी ग्रंथालयातील २५ हजार ग्रंथा ची ऑनलाईन डाटा एन्ट्री पूर्ण करून वाचकांना ई ग्रंथालय अज्ञावली च्या माध्यमातून सेवा सुरु केली आहें. तसेच जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या नवीन इमारतीचे काम प्रगती पथावर आहें. राहाता व पाथर्डी येथे डिजिटल उपकेंद्र स्थापण केले. आणि अनेक ग्रंथालयांच्या इमारत बांधकामासाठी/साधन सामग्री साठी राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिसठानच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला. त्यांच्या आदरयुक्त भीतीमुळे जिल्ह्यातील ग्रंथालयांमध्ये सुसूत्रता आली, प्रगती झाली. त्यांच्या सर्वांना विश्वासात घेऊन काम करण्याच्या पद्धतीमुळे ते सर्वांना आपलेसे वाटात डिसेम्बर २०२३ पासून तें महाराष्ट्र राज्याच्या ग्रंथालय संचालक पदाचा ही पदभार सांभाळत आहेत.

ते जरी कोकण भवन येथे गेले तरी अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रंथालयांचे व कार्यकर्त्यांचे संबंध असे वृद्धिंगत होत राहतील. अशी भावना अहिल्यानगर जिल्यातील ग्रंथालय कार्यकर्ते,, सेवक, वं जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथील अधिकारी,कर्मचारी वं वाचक सभासद यांनी व्यक्त केली आहे.

## दिल्ली गेट येथील शनी मारुती मंदिरात ज्ञानशक्ती वाचनालयाचे उत्साहात उद्घाटन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** दिल्ली गेट येथील प्रसिद्ध शनी मारुती मंदिरात भाविकांसाठी मंगळवार दि.३० जून २०२६ रोजी ज्ञानशक्ती वाचनालयाचा भव्य उद्घाटन सोहळा संपन्न झाला. मंदिर महासंघाच्या वतीने या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना अध्यात्म आणि धर्मशिक्षणाची गोडी लागावी, या उद्देशाने हे वाचनालय सुरू करण्यात आले आहे.

या वाचनालयाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे येथे येणाऱ्या भाविकांसाठी विविध धार्मिक, आध्यात्मिक आणि धर्मशिक्षण देणारे अनेक दुर्मिळ व मार्गदर्शक ग्रंथ विनामूल्य वाचनासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यामुळे केवळ दर्शनच नव्हे, तर मंदिराच्या पवित्र वातावरणात येणाऱ्या पिढीला संस्कार आणि ज्ञानाची शिदोरी मिळणार असल्याचे संयोजकांनी सांगितले.

या महत्त्वपूर्ण प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर आणि हिंदू संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये शनि मारुती मंदिराचे अध्यक्ष श्री. मच्छिंद्र डवरे, सचिव श्री. लक्ष्मण इगे, सहसचिव श्री. अतुल पिंपरकर, मंदिराचे पुजारी श्री. अमोल नागापुरे, जिल्हा हिंदू संघटक श्री. बापू ठाणगे, हिंदू जनजागृती समितीचे श्री. रामेश्वर भुकन, ॲड. श्रीराम भारदे, ह.भ.प. प्रभाताई भोंग, श्री. सुनील शिंदे, मच्छिंद्रनाथ देवस्थानचे सचिव श्री. बाबासाहेब मस्के, श्री. बाबासाहेब चौधरी, श्री. संजय जोशी आणि श्री. चैतन्य शेकडे यांचा समावेश होता. या उपक्रमामुळे मंदिर परिसरातून आणि परिसरात राहणाऱ्या नागरिकांमधून अत्यंत सकारात्मक प्रतिक्रिया उमटत असून, भाविकांनी या ज्ञानशक्ती वाचनालयाचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## मे देसाई इन्फ्रास्ट्रक्चरच्या ठेकेदाराने मनमानी करत मुख्य रस्ता, सपाट भाग खोदल्याने शेतकऱ्यांची गैरसोय



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** राहता तालुक्यातील कनकुरी शिवारात पाटबंधारे विभागाचे काम करणाऱ्या मे देसाई इन्फ्रास्ट्रक्चरच्या ठेकेदाराने मनमानी करत मुख्य रस्ता आणि सपाट भाग खोदल्याने शेतकऱ्यांची मोठी गैरसोय झाली आहे. यामुळे वाहतुकीचा रस्ता पूर्णपणे बंद झाला असून, शेतकऱ्यांना शेतात जाणेही कठीण झाले आहे.

विशेष आणि संतापजनक बाब म्हणजे सदर कामासाठी फोकलेन आणि ढंपर अशी वाहने काम करत असून त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी नेमलेला व्यक्ती हा पूर्णपणे मद्यधुंद अवस्थेत तेथील शेतकऱ्यांना दमदाटी करत असल्याचा प्रकार समोर आला असून त्याच्याकडे दारूच्या बाटल्या देखील सापडल्या आहेत तसेच तेथील काही लोकांकडून त्याने पैसे सुद्धा घेतल्याची चर्चा आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कनकुरी शिवारातील गट नं. ११६, ११७ व ११८ समोरील मुख्य रस्ता आणि सपाट भागातील मुरूम व माती ठेकेदाराने उचलली आहे. या कामामुळे रस्त्यावर मोठे खड्डे पडले असून, काढलेली माती इतरत्र भर टाकण्यासाठी वापरण्यात आली आहे. या प्रकारामुळे शेतकऱ्यांची वाहतूक ठप्प झाली आहे. या संदर्भात शेतकरी पवार यांनी तलाठ्यांकडे तक्रार नोंदवली असून कनकुरी चे तलाठी यांनी स्वतः घटनेची प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा करण्यासंदर्भात मे देसाई इन्फ्रा च्या ठेकेदाराचा व्यवस्थापक रमेश वाळुंज यांना सदर कामाची कागदपत्रे सादर करण्यासाठी कार्यालयात हजर होण्यास सांगितले असून स्थानिक शेतकऱ्यांनी संबंधित ठेकेदारावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी आणि आमच्या वाहतुकीसाठी रस्ता पूर्ववत करून देऊन खड्डे बुजवून रस्ता सपाट करावा,'' अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. आता प्रशासन या ठेकेदारावर काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## बुरुडगावात १५० विद्यार्थ्यांना मोफत सायकलींचे व शैक्षणिक साहित्याचेवाटप

### युवा उद्योजक संकेत कुलट यांनी आमदार संग्राम जगताप यांच्या प्रेरणेतून सलग तिसऱ्या वर्षी राबविला उपक्रम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवासात येणाऱ्या अडचणी दूर करून त्यांना शाळेत नियमितपणे जाता यावे, या उद्देशाने बुरुडगाव येथील युवा उद्योजक संकेतभाऊ कुलट यांनी यंदाही सामाजिक बांधिलकी जपत १५० विद्यार्थ्यांना मोफत नवीन सायकलींचे वाटप केले. आमदार संग्राम जगताप यांच्या प्रेरणेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासाठी उत्साह निर्माण झाला आहे.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर जनजीवन माध्यमिक विद्यालय आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बुरुडगाव येथील विद्यार्थ्यांसाठी आयोजित कार्यक्रमात नवीन सायकलींचे उत्साहपूर्ण वातावरणात वितरण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना केवळ सायकलीच नव्हे, तर शाळेच्या दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेल्या स्कूल बॅग, वह्या, कंपास बॉक्स तसेच इतर शैक्षणिक साहित्याचेही मोफत वाटप करण्यात आले.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच सायकल आणि शैक्षणिक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. विशेषतः वाडी–वस्ती आणि ग्रामीण भागातून दररोज लांब अंतर पायी प्रवास करून शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम मोठा दिलासा ठरला आहे. आता या विद्यार्थ्यांचा वेळ वाचणार असून, नियमित उपस्थिती वाढण्यास आणि शिक्षणात सातत्य राखण्यासही मदत होणार आहे.

संकेतभाऊ कुलट हे गेल्या सलग तीन वर्षांपासून हा सामाजिक उपक्रम सातत्याने राबवत आहेत. या कालावधीत त्यांनी ५०० हून अधिक विद्यार्थ्यांना मोफत सायकलींचे वितरण करून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला नवी दिशा दिली आहे. शिक्षणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे ही समाजाप्रती आपली जबाबदारी त्यांनी या उपक्रमातून जपली आहे.

ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे शाळेत जाण्यासाठी वाहतुकीच्या अडचणींचा सामना करावा लागतो. अशा विद्यार्थ्यांना सायकलींचा लाभ मिळाल्याने त्यांचा शाळेपर्यंतचा प्रवास अधिक सुरक्षित, सुलभ आणि वेळेची बचत करणारा ठरणार आहे. त्यामुळे या उपक्रमाचे पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांनीही कौतुक केले.

## नॉर्वेमधील जागतिक युरोपियन समर रिसर्च स्कूलसाठी अहिल्यानगर युवा वास्तुविशारद आमेर शेख यांची निवड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरासाठी अभिमानाची बाब ठरावी अशी उल्लेखनीय कामगिरी स्थानिक युवा वास्तुविशारद आर्किटेक्ट आमेर अख्तर शेख यांनी केली आहे. नॉर्वे येथील येथे आयोजित करण्यात आलेल्या २०२६ (एसएनयूजी युरोपियन समर रिसर्च स्कूल ऊर्जाक्षम इमारतींसाठी स्मार्ट व शाश्वत इमारत आवरणांवरील संशोधन प्रशिक्षण) या अत्यंत प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय कार्यक्रमासाठी त्यांची जागतिक स्तरावर निवड झाली. या माध्यमातून त्यांनी अहिल्यानगर तसेच भारताचे प्रतिनिधित्व करत शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

युरोपियन युनियनच्या (शाश्वत बांधकाम संशोधन प्रकल्प) अंतर्गत २२ ते २६ जून २०२६ या कालावधीत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. (परिपत्रक बांधकाम पद्धती), (ऊर्जाक्षम बांधकाम पर्यावरण) आणि (डिजिटल कार्यपद्धती) या भविष्यातील वास्तुकला व बांधकाम क्षेत्रासाठी महत्त्वाच्या विषयांवर सखोल प्रशिक्षण देण्यात आले. विशेष म्हणजे, या समर रिसर्च स्कूलसाठी जगभरातील (पदव्युत्तर विद्यार्थी), (पीएच.डी. संशोधक) तसेच दहा वर्षांहून अधिक संशोधन व औद्योगिक अनुभव असलेल्या व्यावसायिकांकडून अर्ज मागविण्यात आले होते. अत्यंत कठोर निवड प्रक्रियेनंतर केवळ २० सहभागींची अंतिम निवड करण्यात आली.

यामध्ये भारतातून केवळ दोन प्रतिनिधींना संधी मिळाली होती. भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई येथील एका पीएच.डी. संशोधक आणि अहिल्यानगरचे युवा वास्तुविशारद आर्किटेक्ट आमेर अख्तर शेख यांची निवड झाली. त्यामुळे या जागतिक व्यासपीठावर भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मोजक्या भारतीयांमध्ये त्यांचा समावेश झाला.

या कार्यक्रमामध्ये चार प्रमुख संशोधन मॉड्यूल्सद्वारे आधुनिक शाश्वत वास्तुकलेच्या विविध पैलूंवर प्रशिक्षण देण्यात आले.इमारतीच्या संपूर्ण जीवनचक्रातील पर्यावरणीय परिणामांचे मूल्यांकन) आणि (संपूर्ण जीवनचक्रातील आर्थिक खर्चाचे विश्लेषण) यांच्या साहाय्याने बांधकाम साहित्याची पर्यावरणीय व आर्थिक उपयुक्तता कशी मोजावी याचे प्रशिक्षण देण्यात आले.

## शिवम गवळीची शिष्यवृत्ती परीक्षेत तालुक्यात प्रथम; जिल्ह्यात तृतीय क्रमांक



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** नारायणगाव येथील प्रगतिशील शेतकरी सचिन बळी गवळी यांचे चिरंजीव शिवम सचिन गवळी याने इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत पैठण तालुक्यात प्रथम आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात तृतीय क्रमांक मिळविला आहे.

शिवमच्या या यशामुळे नारायणगाव परिसरात आनंदाचे वातावरण असून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या यशामागे शिवमची मेहनत, पालकांचे मार्गदर्शन आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नारायणगाव येथील शिक्षकवृंदांचे मोलाचे सहकार्य असल्याची भावना व्यक्त होत आहे.

शिवमच्या यशामुळे जिल्हा परिषद शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली असून गावकऱ्यांनी त्याचे तसेच शिक्षक आणि पालकांचे अभिनंदन केले आहे.

## ॲप्राईज ट्युटोरियल्सचा सीए फाउंडेशन परीक्षेत ८० टक्के निकाल!

### उत्तम संस्था केवळ विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी तयार करत नाही, तर त्यांना उत्कृष्टतेच्या शिखरावर पोहोचण्यासाठी घडवते

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जेव्हा उत्कृष्टता ही सवय बनते, तेव्हा यश ही परंपरा बनते.'' या विचाराला साजेसा इतिहास ॲप्राईज ट्युटोरियल्सने यंदाच्या मे २०२६ सीए फाउंडेशन परीक्षेच्या निकालात पुन्हा एकदा घडविला आहे. आपल्या यशस्वी वाटचालीची सहा वर्षे पूर्ण करत संस्थेने तब्बल ८० टक्के निकालाची अभूतपूर्व नोंद केली आहे. देशातील सीए फाउंडेशन परीक्षेचा निकाल २० टक्के, तर जिल्ह्याचा निकाल २२ टक्के असताना ॲप्राईज ट्युटोरियल्सने राष्ट्रीय सरासरीच्या तिप्पट यश संपादन करून आपल्या गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती दिली आहे. सातत्यपूर्ण उत्कृष्ट निकालांची परंपरा जपत ॲप्राईज ट्युटोरियल्सने



केवळ प्रस्थापित निकषांचे पालन केले नाही, तर यशाचे नवे मापदंड निर्माण केले आहेत. ''अभ्यास, सराव, यश'' या ब्रीदवाक्याचा अवलंब करत संस्था विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, कठोर परिश्रम आणि यशाचा निश्चित मार्ग दाखवत आहे.

यंदाच्या सीए फाउंडेशन परीक्षेत ॲप्राईज ट्युटोरियल्सच्या विद्यार्थ्यांनी आपल्या उल्लेखनीय कामगिरीने इतिहास घडविला आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांनी एसआरईएफ चे श्री मोहनलाल रामअवतार मानधना ज्युनिअर कॉलेजचेही विद्यार्थी म्हणून शिक्षण घेतले आहे. पहिल्याच प्रयत्नात सीए फाउंडेशन परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये मेहेक डुंगरवाल (प्रथम), प्रणव वाघमारे, विधी मुथा, रिया मनियार, ओवी सुवर्णपाठकी, पिनाक दिवाणी, यश ठोंबरे,जय गांधी, भावेश चंगेडे , विधी झवर ,शुभ खंडेलवाल, वीर खिवसरा, रोहन बोरा, नील काठेड आणि त्रिशा अग्रवाल,नमन खंडेलवाल यांचा समावेश आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या अथक परिश्रम, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर हे उल्लेखनीय यश संपादन करत ॲप्राईज ट्युटोरियल्सच्या यशस्वी परंपरेत आणखी एका सुवर्ण अध्यायाची भर घातली आहे.

प्रत्येक यशस्वी विद्यार्थ्यामागे आत्मविश्वास जागवणारा, सुप्त गुणांना योग्य दिशा देणारा आणि स्वप्नांचे यशात रूपांतर करणारा समर्पित शिक्षक उभा असतो. विद्यार्थ्यांचे हे यश त्यांच्या कठोर परिश्रम, जिद्द आणि ॲप्राईज ट्युटोरियल्सच्या शिक्षकांनी केलेल्या मोलाच्या मार्गदर्शनाचे फलित आहे. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना संस्थेतील शिक्षकांनी दिलेल्या योग्य दिशेची आणि अखंड प्रेरणेची जोड लाभल्यामुळेच हा ऐतिहासिक यशाचा टप्पा गाठता आला.

# श्री सत्यसाईबाबांच्या दिव्य पादुकांसह रथयात्रेचे नगरमध्ये जल्लोषात आगमन

## लक्षवेधी पुष्पवृष्टी; टाळ मृदंगाच्या निनादाने वातावरण साईमय





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री सत्यसाईबाबांच्या दिव्य पादुकांसह रथयात्रेचे नगरमधील सक्कर चौकात जल्लोषपूर्ण वातावरणात आगमन झाले. यावेळी रथावर करण्यात आलेली पुष्पवृष्टी लक्षवेधी ठरली. टाळ मृदंगाच्या निनादाने शोभायात्रा मार्गावरील वातावरण साईमय झाले.

महापौर सौ.ज्योतीताई गाडे यांनी पादुकांसमोर नतमस्तक होऊन धन्यतेची अनुभूती घेतली. श्री सत्यसाई सेवा संघटनेचे जिल्हाप्रमुख श्री. अशोक कुरापाटी यांच्या हस्ते त्यांना शाल आणि ग्रंथ भेट देऊन गौरविण्यात आले. या सोहळ्यात बोलताना त्या म्हणाल्या–मानव, बंधुत्व आणि ईश्वरी पितृत्व या वैश्विक भावनेने सत्य, धर्म, शांती, प्रेम, एकता असे राष्ट्रहिताचे महत्वपूर्ण संदेश संपूर्ण भारतभर देत निघालेल्या श्री सत्यसाई प्रेमवाहिनी रथयात्रेचे आणि दिव्य पादुकांचे आगमन आपल्या शहरात झाले, हे नगरवासियांचे भाग्यच आहे. श्री सत्यसाई सेवा संघटनेने अहिल्यानगरवासियांना या सोहळ्यात सामावून घेत कार्यक्रमाचे सुरेख नियोजन केले आहे. स्थानिक नवकलाकारांना नृत्य, संगीत, अभिनय या कलांचे सादरीकरण श्री सत्यसाईबाबांसमोर करण्याची संधी देऊन व्यासपीठ उपलब्ध करून देत सर्वांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली आहे, हे कौतुकास्पदच आहे.

नगर जिल्ह्याच्यावतीने काष्टी येथे रथयात्रेचे स्वागत करण्यात आले. नगर शहरातील कायनेटिक चौकापासून रथासोबत मोटारसायकल व सायकल रॅली निघाली. सक्कर चौकात रथयात्रा येताच साईभक्तांचा उत्साह शिगेला गेला. सर्वांनी उच्च स्वरात श्री सत्यसाईबाबांचा जयघोष केला. सक्कर चौकापासून शोभायात्रा सुरू झाली. शोभायात्रेच्या अग्रभागी घोडेस्वार, तुतारीवाले, बॅण्ड पथक, महिलांचे लेझीम पथक, आळंदी येथील हभप ज्ञानेश्वर महाराज कावरे यांच्या तुकोबाराय वारकरी शिक्षण संस्थेच्या बाल वारकऱ्यांचे पथक, प्रबोधनात्मक फलक हाती घेतलेला बालविकासचा बालचमू होता. बालविकास गुरू, पालक, ज्येष्ठ नागरिक आणि श्री सत्य साई भक्त परिवार शोभायात्रेत मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. रथावर ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करण्यात आली. नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्समध्ये या शोभायात्रेचे आगमन मोठ्या थाटात झाले.

रथामधील पादुकांचे विधीवत पूजन करताना वेदपठण करण्यात आले. पौरोहित्य वेदमूर्ती श्री. उमेश वाळुंजकर यांनी केले. साईभक्तांच्या हस्ते मंगल महाआरती करण्यात आली. यावेळी उपस्थित विविध धर्मगुरूंनी सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना केली. या सर्वांचा यथोचित सन्मान करण्यात आला. त्यानंतर सौ.ज्योती श्रोत्री, सौ.रेखा शर्मा व श्री. अनिल शर्मा यांचे बालविकास वर्गातील विद्यार्थ्यांसह वेदसार पठणम् झाले. सौ.अमृता बेडेकर, सौ. स्वप्ना बेडेकर, सौ.श्रेया सुवर्णपाठकी, सौ.अनुजा कुलकर्णी यांचे अथर्वशीर्ष पठषम् होताच सांस्कृतिक महोत्सवाचा श्रीगणेशा करण्यात आला. शहरातील विविध नृत्यालयाच्या कलाकारांनी नृत्याचे सादरीकरण करताना भाविकांकडून वाहवा मिळवली. एकापाठोपाठ होणारे तालबद्ध सादरीकरण टाळ्या मिळवतानाच साईभक्तांची ब्रह्मनंदी टाळी लावणारे ठरले. सौ.आरती पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली सत्यसाई बालविकासच्या विद्यार्थ्यांनी व साई भक्तांनी सत्य साईच्या भजनाचा भक्ती भाव अर्पण केला. श्रीसत्यसाईबाबांचे संदेशानुसार जीवनातील आचरण ठेवण्याचा मनोमनी संकल्प करत उपस्थित सर्वांनी अत्यंत श्रध्देने भोजन प्रसादाचा लाभ घेतला.

# प.पू. श्री. प्रविणऋषीजींचा चातुर्मास नगरवासीयांना अध्यात्मिक ऊर्जा देणारा ठरेल – आ. संग्राम जगताप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराजांच्या समाधीस्थळाच्या पावन भूमीत तथा महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी महाराजांच्या सान्निध्यात संपन्न होणारा उपाध्याय प्रवर प.पू. श्री. प्रविणऋषीजी म.सा. आदी ठाणा४ यांचा 'समर्पण सर्वकल्याण चातुर्मास२०२६' अहिल्यानगरवासीयांसाठी अध्यात्मिक ऊर्जा, संस्कार, सामाजिक एकात्मता आणि समाजजागृतीची प्रेरणा देणारा ठरेल, असा विश्वास आमदार संग्रामभैय्या जगताप यांनी व्यक्त केला.

महावीर नगर येथील श्री चंदनमल सुराणा (देहरेकर) जैन धर्म स्थानकात प.पू. श्री. प्रविणऋषीजी महाराजांच्या मंगल प्रवेशानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जैन धर्म स्थानकाचे अध्यक्ष अनिल कटारिया यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

यावेळी 'आनंदतीर्थ' मोबाईल ॲप तसेच 'समर्पण सर्वकल्याण चातुर्मास२०२६' कार्यक्रम पत्रिकेचे विमोचन व प्रकाशन ॲड. सुभाष काकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत नगर शहराचे लाडके आमदार संग्रामभैय्या जगताप यांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक (बाबुशेठ) बोरा यांनी प्रास्ताविकात सांगितले की, हा चातुर्मास संपूर्ण समाजासाठी एक ऐतिहासिक आध्यात्मिक महापर्वणी ठरणार आहे. चातुर्मासाच्या विविध सेवा, उपक्रम आणि आयोजनासाठी समाजातील सर्व स्तरांतून स्वयंस्फूर्तीने तन, मन आणि धनाने मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद अत्यंत प्रेरणादायी आहे. या समर्पण भावनेचे जिवंत उदाहरण म्हणजे चातुर्मासाचे प्रमुख लाभार्थी म्हणून सौरभ बोरा व त्यांच्या परिवाराने कोणताही आग्रह न होता स्वयंस्फूर्तीने ही जबाबदारी स्वीकारून समर्पणाचा आदर्श घालून दिला आहे. अशा समाजहितैषी व धर्मनिष्ठ सहकार्यामुळे संयोजन समितीचा उत्साह अधिकच द्विगुणित झाला असून, सर्वांच्या सामूहिक सहभागातून हा चातुर्मास सर्वार्थाने यशस्वी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ते पुढे म्हणाले की, 'समर्पण सर्वकल्याण चातुर्मास२०२६' कार्यक्रम पत्रिकेत संपूर्ण चातुर्मासातील प्रमुख धार्मिक, आध्यात्मिक, सामाजिक व संस्कारमूलक उपक्रमांची विस्तृत माहिती समाविष्ट करण्यात आली आहे. ही पत्रिका राज्यासह देशभरातील जैन कुटुंबांपर्यंत पोहोचविण्यात येणार असून, या ऐतिहासिक व शिखर चातुर्मासाचा भाग होण्यासाठी सर्वांना प्रेमपूर्वक निमंत्रण देण्यात येणार आहे.

समितीचे महामंत्री आदेश चंगेडिया यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, या कार्यक्रम पत्रिकेच्या प्रकाशनातून केवळ एका निमंत्रणाचे नव्हे, तर समर्पण, संघभावना आणि धर्मनिष्ठेच्या एका व्यापक संकल्पाचे शुभारंभ होत आहे.

# पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत सविता रमेश फिरोदिया प्रशालेचे दैदिप्यमान यश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने गुणवत्तेची परंपरा जपणाऱ्या सविता रमेश फिरोदिया प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच पार पडलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत प्रशालेच्या नावाला पुन्हा एकदा उजाळा दिला आहे. इयता ५ वी तील १० विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय यादीत येण्याचा मान पटकावला तसेच त्यांना प्रति वर्ष ५००० रुपये शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे . त्यांच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यावेळी चेअरमन दिलीप गुंदेचा , व्हाईस चेअरमन दशरथ खोसे ,सेक्रेटरी र. धो. कासवा, सहसेक्रेटरी राजेश झालानी, खजिनदार ॲड. विजयकुमार मुनोत यांच्यासह सर्व विश्वस्त उपस्थित होते

पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत आलेले दहा विद्यार्थी पुढीलप्रमाणे लगड त्वरिता सुरेश (२५६ गुण ) गायकवाड राजनंदिनी सागर (२५४ गुण ) वाघचोरे



वेदिका अवधूत (२५४ गुण ), गायकवाड पायल किरण (२३८ गुण ) चेमटे ओमकार नितीन (२३० गुण ) बोराडे हर्ष राहुल (२३२ गुण ) माळी आदर्श दत्तात्रय ( २२६ गुण ) गर्जे आदर्श उद्धव (२१८ गुण ) कांडेकर स्वराज बाबासाहेब ( २१६ गुण ) माडगे गौरव गणेश ( २०६ गुण ) या सर्व यशामागे प्रशालेतील सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला चालना देत सातत्याने केलेल्या परिश्रमांचे हे फळ असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी चेअरमन दिलीप गुंदेचा यांनी मार्गदर्शन करत सांगितले की, ''आजचा काळ हा ज्ञान, कौशल्य आणि नवोन्मेष यांचा संगम असलेला आहे. अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या विचारक्षमतेला चालना मिळते, त्यांच्या आकलनशक्तीत वाढ होते आणि ते केवळ पाठांतरावर न थांबता संकल्पनात्मक शिक्षणाकडे वळतात. सविता रमेश फिरोदिया प्रशालेने नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला आहे.''

सहसचिव राजेश झालानी म्हणाले की, ''आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी केवळ गुणांच्या मागे न लागता ज्ञानाच्या शोधात राहणे आवश्यक आहे. अशा परीक्षांमुळे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होतो आणि यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेली जिद्द विकसित होते. संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आम्ही नेहमीच पाठबळ देत राहू.'' यावेळी उपाध्यक्ष दशरथ खोसे ,सचिव र.धो.कासवा, खजिनदार ॲड. विजयकुमार मुनोत यांनी गुणवंत विद्यार्थी यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच यावेळी सर्व विश्वस्त उपस्थित होते.

# आमदार विलास भुमरे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** पैठणचे आमदार विलास पाटील भुमरे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांची भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. भारत झारगड व पंचायत समिती सदस्या सौ. सखूताई झारगड यांनी आमदार भुमरे यांचा पुष्पहार घालून व शाल अर्पण करून सत्कार केला तसेच त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि जनसेवेच्या कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी उपस्थित कार्यकर्ते व मान्यवरांनी आमदार भुमरे यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघात विकासकामांना अधिक गती मिळो, अशी अपेक्षा व्यक्त केली. वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी नागरिक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.

# पावसाळ्यात आहारात हंगामी पदार्थांचा समावेश करा आणि निरोगी राहा

## वोक्हार्ट हॉस्पिटल, नागपूरच्या चीफ डायटीशियन स्वाती अवस्थी यांचा पावसाळ्यातील आहाराविषयी आरोग्यदायी सल्ला

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** पावसाळ्याच्या आगमनाने उन्हाळ्याच्या तीव्र उकाड्यापासून मोठा दिलासा मिळतो. पहिल्या पावसाचा मातीचा सुगंध, गरमागरम चहाचा कप आणि चविष्ट गरम पदार्थ खाण्याची इच्छा यामुळे हा ऋतू अनेकांचा आवडता असतो. मात्र, हवामान आल्हाददायक असले तरी या काळात हवेत आर्द्रता वाढते, तापमानात सतत बदल होतात आणि संसर्गाचा धोका वाढतो. त्यामुळे पचनावर परिणाम होऊ शकतो आणि शरीराची रोगप्रतिकारक शक्तीही कमी होऊ शकते.

स्वाती अवस्थी, चीफ डायटीशियन, वोक्हार्ट हॉस्पिटल, नागपूर यांच्या मते, पावसाळ्यात निरोगी राहण्यासाठी सर्वात सोपा उपाय म्हणजे हंगामानुसार उपलब्ध ताजे आणि स्थानिक अन्नपदार्थ खाणे. या ऋतूत निसर्ग आपल्याला शरीराला आवश्यक पोषण देणारे ताजे, स्थानिक आणि पौष्टिक अन्न भरपूर प्रमाणात उपलब्ध करून देतो.

पावसाळ्यात सर्वाधिक आवडीने खाल्ल्या जाणाऱ्या पदार्थांपैकी भाजलेले ताजे मक्याचे कणीस हे एक आहे. चविष्ट असण्याबरोबरच मक्यामध्ये भरपूर तंतुमय घटक (फायबर), आवश्यक जीवनसत्त्वे आणि अँटिऑक्सिडंट्स असतात. हे पचन चांगले ठेवण्यास मदत करतात आणि शरीराला दीर्घकाळ ऊर्जा देतात. त्यामुळे पावसाळ्यात संध्याकाळी तळलेले पदार्थ किंवा पॅकेटबंद चिप्स खाण्याऐवजी भाजलेले कणीस हा अधिक पौष्टिक आणि आरोग्यदायी पर्याय ठरतो.

पावसाळ्यात जांभूळ, नाशपती, आलूबुखार, पीच आणि डाळिंब यांसारखी अनेक हंगामी फळेही उपलब्ध असतात. या फळांमध्ये भरपूर जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्स असतात. त्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि हंगामी आजारांपासून संरक्षण मिळते. विशेषतः जांभूळ रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यास आणि पचन सुधारण्यास उपयुक्त मानले जाते.

पावसाळ्यात ताजे, गरम आणि घरचे शिजवलेले अन्न खाणे सर्वात योग्य ठरते. भाजीची खिचडी, डाळ-भात, सूप, वाफवलेल्या इडल्या, पोहे, उपमा आणि घरचे भाजीचे पराठे हे पदार्थ चविष्ट, पौष्टिक आणि पचायला हलके असतात. हे पदार्थ शरीराला संतुलित पोषण देतात आणि दमट हवामानामुळे संवेदनशील होणाऱ्या पचनसंस्थेवर अतिरिक्त ताण येऊ देत नाहीत.

रोजच्या आहारात आले, हळद, लसूण, काळी मिरी, दालचिनी आणि जिरे यांसारख्या मसाल्यांचा समावेश केल्यास आरोग्याला अधिक फायदा होतो. या मसाल्यांमध्ये नैसर्गिक जंतुनाशक आणि दाह कमी करणारे गुणधर्म असतात. त्यामुळे अन्नाची चव वाढण्याबरोबरच शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होण्यास आणि संसर्गापासून संरक्षण मिळण्यास मदत होते.

हिरव्या पालेभाज्या पौष्टिक असल्या तरी पावसाळ्यात त्या वापरताना विशेष काळजी घेणे आवश्यक असते. या काळात त्यावर माती, ओलावा आणि जंतू साचण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे स्वाती अवस्थी, चीफ डायटीशियन, वोक्हार्ट हॉस्पिटल, नागपूर यांच्या मते, पालेभाज्या नीट स्वच्छ धुवून आणि चांगल्या प्रकारे शिजवूनच खाव्यात. तसेच, उघड्यावर विकले जाणारे रस्त्यावरील खाद्यपदार्थ, कापून ठेवलेली फळे आणि बराच वेळ साठवून ठेवलेले अन्न खाणे टाळावे. असे अन्न खाल्ल्याने अन्नातून होणाऱ्या संसर्गाचा धोका वाढू शकतो.

पावसाळ्यात पुरेसे पाणी पिणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे, पण अनेकदा त्याकडे दुर्लक्ष होते. हवामान थंड असल्यामुळे तहान कमी लागते आणि नकळत पाणी कमी प्यायले जाते. मात्र, पचनक्रिया, रक्ताभिसरण आणि शरीराच्या एकूण आरोग्यासाठी पुरेशा प्रमाणात द्रवपदार्थांची गरज असते. त्यामुळे कोमट पाणी, घरचे सूप, हर्बल चहा, नारळपाणी आणि ताजे तयार केलेले पेय यांचा आहारात समावेश करावा. यामुळे शरीरात पाण्याचे प्रमाण टिकून राहते आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते.

पावसाळा म्हटला की गरमागरम चहा आणि भजी यांची आठवण हमखास येते. मात्र, आरोग्यदायी आहार म्हणजे आवडीचे पदार्थ पूर्णपणे सोडणे असा त्याचा अर्थ नाही. हे पदार्थ अधूनमधून आणि मर्यादित प्रमाणात खावेत. त्याचबरोबर रोजच्या आहारात ताजे, संतुलित आणि पौष्टिक अन्नाचा समावेश करा. त्यामुळे पावसाळ्याचा आनंदही घेता येईल आणि आरोग्यही चांगले राहील.

पावसाळ्यात निरोगी राहण्यासाठी महागडे सुपरफूड किंवा अवघड डाएट करण्याची गरज नाही. त्याऐवजी हंगामानुसार उपलब्ध ताजे आणि स्थानिक अन्नपदार्थ खाण्यावर भर द्यावा. असे अन्न शरीराच्या पोषणाच्या गरजा नैसर्गिकरित्या पूर्ण करते. ऋतूनुसार आहार घेतल्याने पचन सुधारते, रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि पावसाळ्यात होणाऱ्या सामान्य आजारांचा धोका कमी होतो.

या पावसाळ्यात आपल्या ताटात निसर्गाची समृद्ध देणगी असू द्या. रंगीबेरंगी हंगामी फळे, भाजलेले कणीस, ताजे घरगुती जेवण, पौष्टिक सूप आणि पिढ्यानपिढ्या वापरले जाणारे पारंपरिक मसाले यांचा आहारात समावेश करा. दररोज योग्य आणि जाणीवपूर्वक आरोग्यदायी आहाराची निवड केल्यास पावसाळ्याचा आनंद घेतानाच स्वतःचे आणि आपल्या कुटुंबाचे आरोग्यही उत्तम राखता येईल.

''हंगामी अन्न खा. स्थानिक अन्न खा. ताजे अन्न खा. या पावसाळ्यात निसर्गालाच तुमच्या शरीराला आतून पोषण देऊ द्या.''

# केंद्रीय मंत्री रामदास आठवले मंगळवारी अहिल्यानगरमध्ये

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** केंद्रीय मंत्री रामदास आठवले मंगळवारी (दि.७ जुलै) अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे. दुपारी २ वाजता शहरातील शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार परिषद होणार आहे. तसेच यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय येथील सभागृहात जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक व विविध खात्यातील प्रमुख अधिकाऱ्यांसह आढावा बैठक होणार आहे. या बैठकीनंतर ते शेवगाव येथील कार्यक्रमाला रवाना होणार असल्याची माहिती रिपब्लिकन पक्षाचे दक्षिण जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे यांनी दिली.

शेवगाव येथे ४ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पूर्णाकृती पुतळा व सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन ना. आठवले यांच्या हस्ते होणार आहे.



यावेळी आयोजित करण्यात आलेल्या संकल्प मेळाव्यात रिपब्लिकन पक्ष नगर दक्षिणच्या वतीने ना. आठवले यांची केंद्रात राज्य मंत्रीपद तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल व राज्यसभा सदस्यपदी तिसऱ्यांदा नियुक्ती झाल्याबद्दल नागरी सत्कार केला जाणार आहे. तसेच या मेळाव्यात नगर दक्षिण मधील मोठ्या संख्येने कार्यकर्ते रिपब्लिकन पक्षात प्रवेश करणार आहेत. या कार्यक्रमाची पूर्ण तयारी झाल्याची माहिती देखील जिल्हाध्यक्ष साळवे यांनी दिली आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व तालुकाध्यक्ष जिल्हा कमिटी व राज्याचे प्रमुख नेते यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी माजी खासदार सुजय विखे पाटील, आजी-माजी मंत्री, आमदार यांच्यासह अविनाश मातेकर, राज्याचे अध्यक्ष राजा सरवदे, राष्ट्रीय युवा नेते जीत रामदास आठवले, राष्ट्रीय उपाध्यक्ष काकासाहेब खंबाळकर, राष्ट्रीय सचिव विनोद निकाळजे, राष्ट्रीय कार्याध्यक्ष कांतीकुमार जैन, प्रदेश सरचिटणीस गौतम भाऊ सोनवणे, प्रदेश कार्याध्यक्ष बाबुराव कदम, युवक प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, राज्याचे उपाध्यक्ष तथा संपर्कप्रमुख श्रीकांत भालेराव, राज्य उपाध्यक्ष विजय वाकचौरे, ज्येष्ठ नेते अशोक गायकवाड, उत्तर जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, राजा कापसे, लॉरेन्स स्वामी, मुंबई अध्यक्ष संजय डोळसे, भीमराज बागुल, रमेश गायकवाड, किरण दाभाडे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

(पान १ वरुन)

## पारनेरमध्ये एलसीबीकडून मावा व सुगंधित तंबाखू जप्त

पोलिसांनी एकूण २ लाख ५८ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध पारनेर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२३, २२३, २७४, २७५, ३(५) आणि अन्न सुरक्षा मानके अधिनियम २००६ चे कलम ५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## रेकॉर्डवरील २२० गुन्हेगारांची पोलीस मुख्यालयात हजेरी!

अहिल्यानगर पोलीस दलाकडून यापुढेही अशाच प्रकारच्या कठोर आणि प्रतिबंधात्मक कारवाया सुरु राहणार असल्याचा स्पष्ट संदेश देण्यात आला आहे.

## नेवासा फाट्यावर एका तरुणावर कोयत्याने हल्ला

किंवा दहशत निर्माण करण्याच्या हेतूने धारदार कोयत्याने जीवघेणा हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात संबंधित तरुण जबर जखमी झाला असून त्याला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. भरदिवसा घडलेल्या या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

**...आणि दराडेंचा 'सिंघम' अवतार सुरू झाला!**

घटनेची माहिती मिळताच नेवासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी क्षणाचाही विलंब न लावता आपल्या टीमसह घटनास्थळाकडे धाव घेतली. आरोपी पळून जाण्याच्या बेतात असतानाच, दराडे यांनी चक्र फिरवून अवघ्या २५ मिनिटांच्या आत आरोपींचा माग काढला आणि त्यांना फिल्मी स्टाईलने जेरबंद केले. पोलिसांनी आरोपींना बेड्या ठोकून त्यांची थेट 'हवा' काढली आणि परिसरात पोलिसांचा दरारा पुन्हा एकदा सिद्ध केला.

**गुन्हेगारांवर ३०७ (खून करण्याचा प्रयत्न) अन्वये गुन्हा दाखल**

पकडण्यात आलेल्या आरोपींवर कायदेशीर बडगा उगारण्यात आला आहे. जखमी तरुणाच्या प्रकृतीचे गांभीर्य आणि हल्ल्याचे स्वरूप पाहता, आरोपींविरोधात भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये (पूर्वीचे कलम ३०७ – खुनाचा प्रयत्न)* गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस या प्रकरणी पुढील सखोल तपास करत आहेत.

**'एकालाही सोडणार नाही!' पीआय प्रताप दराडेंचा कडक इशारा**

कारवाईनंतर गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना खडे बोल सुनावताना पोलीस निरीक्षक प्रताप दराडे म्हणाले:

'गुन्हेगारांनी वेळेत सुधारावे आणि सांभाळून राहावे. नेवासा परिसरातील शांतता भंग करण्याचा किंवा दहशत माजवण्याचा प्रयत्न केला, तर कायदा आपल्या पद्धतीने कठोर कारवाई करेल. पुन्हा जर अशा प्रकारचे वर्तन किंवा गुन्हेगारी कृत्य समोर आले, तर एकालाही सोडणार नाही!'

**नेवासकरांकडून पोलिसांचे कौतुक**

गुन्हा घडल्यानंतर अवघ्या २५ मिनिटांत आरोपी गजाआड झाल्यामुळे नेवासा परिसरातील नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला आहे. पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या या क्विक ॲक्शन आणि दबंग कामगिरीमुळे गुन्हेगारांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून सर्वसामान्य जनतेतून पोलिसांचे आभार मानले जात आहेत.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन**

सदरची धडाकेबाज कामगिरी अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे आणि पोलीस उपाधीक्षक नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली नेवासा पोलिसांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## महावितरणच्या गलथान कारभाराविरोधात खा. नीलेश लंके यांचे जनआंदोलन

आंदोलनाद्वारे अघोषित लोडशेडिंग तातडीने बंद करणे, जळालेल्या डीपी कालबद्ध पद्धतीने बदलणे, स्मार्ट मीटर व वाढीव वीजबिलांची उच्चस्तरीय चौकशी करणे, स्मार्ट मीटर सक्तीचे न ठेवणे, अतिवृष्टीग्रस्त वीज पायाभूत सुविधांची त्वरित दुरुस्ती, सोलर व नेट मीटरिंगची प्रकरणे प्राधान्याने निकाली काढणे, तक्रार निवारण यंत्रणा सक्षम करून निष्काळजी अधिकाऱ्यांवर कारवाई करणे आणि कृषी वीजजोडणीची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करणे, या प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत.

स्थानिक पातळीवर वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न सुटत नसल्याने जनतेच्या संयमाचा अंत झाला आहे. त्यामुळे शेतकरी, ग्रामस्थ आणि नागरिकांसमवेत ८ जुलै रोजी लोकशाही मार्गाने जनआंदोलन करण्यात येणार आहे, असे खासदार नीलेश लंके यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.